cmyk

## संपादकीय

### बळीराजाची सगळीकडूनच गोची

बळीराजा असो किंवा लाडक्या बहिणी असोत विधानसभा निवडणुकीत सत्ता मिळवण्यासाठी त्यांचा वापर करण्यात आला आणि सत्तेवर आल्यावर सत्ताधाऱ्यांना त्यांचा विसर पडल्याची टीका आता होऊ लागली आहे. अर्थात, राज्यातील शेतकऱ्यांबाबत बोलायचे झाले तर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यापेक्षाही त्यांना कर्जातून मुक्ती कशी मिळेल हे पाहणे जास्त महत्त्वाचे आहे. गेल्या पंधरा ते वीस वर्षांच्या कालावधीमध्ये आणि त्यापूर्वी अनेक सरकारांनी हजारो लाखो शेतकऱ्यांची कर्ज माफ केली असली, तरी पुन्हा शेतकरी कर्जबाजारी होतच आहेत.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### बुलडोझर कारवाईबद्दल योगी सरकारला सर्वोच्च न्यायालयाची चपराक

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने बुलडोझर न्यायासाठी ओळखल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेश सरकारला फटकारले आहे. राज्यातील प्रयागराज विकास प्राधिकरणाला बुलडोझरने घरे पाडण्याबद्दल जोरदार चपराक लगावली. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, अधिकाऱ्यांची बुलडोझर कारवाई ही अमानवीय आणि अवैध आहे. २०२१ मध्ये झालेली ही कारवाई इतरांच्या भावनांचा विचार न करणारी आणि त्यांच्या अधिकारांवर हल्ला असल्याचे म्हटले आहे. न्या. अभय ओक आणि न्या. उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी खंडपीठाने नमुद केले की, देशातील नागरिकांच्या निवासस्थानांना अशा प्रकारे पाडण्याचा कोणालाही अधिकार नाही.

बीड – महाराष्ट्र वर्ष –४ अंक–३३७ बुधवार, दि.०२ एप्रिल २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–८ किंमत ३ रूपये

# २५ अधिकाऱ्यांनी राज्याचे कृषी खाते खाऊन टाकले!

बीड । प्रतिनिधी

२५ अधिकाऱ्यांनी महाराष्ट्राचे कृषी खाते खाऊन टाकले आहे. विकास पाटील आणि दिलीप झेंडे हे राज्यातले मुख्य अधिकारी आहेत. त्यांनीच प्रत्येक कृषी मंत्र्यांला शिकवण दिली, असे आरोप आ.सुरेश धस यांनी केले आहेत. कृषी खात्यात अनेक पुरवठादार कंपनी आणि अधिकारी विविध बोगस औषध आणि बियाणे शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. लिंकींगचा प्रकार वाढला आहे. कृषी विभागातील बीडच्या अधिकारी– कर्मचारी यांनी बदली करून देण्यासाठी मोठ्या रकमा दिल्या आहेत. बोगस कंपन्यांचा माल खपविल्या जात आहे. सगळ्यात जास्त बोगस बियाणांच्या कंपनी पश्चिम महाराष्ट्रात आहेत, सुरेश धस यांनी असे गंभीर आरोप केल्याने खळबळ उडाली आहे.

## कृषी विभागात किरण जाधव नावाचा आका ; आ.धस यांच्याकडून गंभीर आरोप



भाजप आमदार सुरेश धस यांनी कृषी विभागातील लिंकींग प्रकाराबाबत खळबळजनक आरोप केले. राज्यात तीस अधिकारी आहेत. त्यांच्या ४३ कंपन्या आहेत. त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने कंपन्या तयार केल्या आहेत. त्या कंपन्यांनी निर्माण केलेला माल लिंकींग करून शेतकऱ्यांच्या माथी बियाणे मारल्याचा आरोप सुरेश धस यांनी केला. सरकारमध्ये नोकरी करताना नातेवाईकांच्या नावांवर, पत्नीचा नावावर कंपन्या करण्यात आल्या. कृषी विभागात आका किरण जाधव आहे. त्याच्या काळात हजारो परवाने दिले गेले आहेत, असे आमदार धस यांनी केले आहेत. सुरेश धस म्हणाले, किरण जाधव याचे अनेक डिलर मित्र आहेत. किरण जाधव आता राज्याच्या दक्षता पथकाचे प्रमुख आहे. सहा महिन्यांत पाच कोटी रुपयांचे कलेक्शन करण्यात आल्याचा

पान २ वर

## असा रंगला दैनिक राज्य लोकतंत्रचा वर्धापनदिन सोहळा



बीड – दैनिक राज्य लोकतंत्रच्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते डॉ, योगेश क्षीरसागर, अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर, उबाठा सेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, गणेश वरेकर, परमेश्वर सातपुते, सीएस डॉ. अशोक थोरात, जि. प. चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानोबा मोकाटे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष आदित्य सारडा, जिल्हा कारागृह अधीक्षक बक्सर मुलानी आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. (सविस्त्र वृत्त पान २ वर) ( छाया:राहूल सावंत)




### प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळला

कोल्हापूर: राष्ट्र पुरुषांविषयी अवमानकारक वक्तव्य आणि इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकरला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, त्याच्या जामीन अर्जावर कोल्हापुरातील जिल्हा सत्र न्यायालयात मंगळवारी (दि.१) सुनावणी झाली. पोलिसांनी जामीन अर्जावर आपले लेखी म्हणणे मांडतांना जामीन देऊ नये, अशी मागणी केली. यावर न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळून लावला.




### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९९.०० क्विंटल | २,२०० | ३,०४१ | २,५७४ |
| ज्वारी/हायब्रिड: १८५.५० क्विंटल | १,८११ | ३,०५१ | २,४२९ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ४१.५० क्विंटल | ६,५०० | ७,१७१ | ६,९८० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ९२.५० क्विंटल | २,००० | २,८६६ | २,५४१ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:३७.०० क्विंटल | ४,०२१ | ४,२०० | ४,०९२ |
| हरभरा: ६२.०० क्विंटल | ५,३०० | ५,३८१ | ५,३४३ |







cmyk

## अग्रलेख

# बळीराजाची सगळीकडूनच गोची

बळीराजा असो किंवा लाडक्या बहिणी असोत विधानसभा निवडणुकीत सत्ता मिळवण्यासाठी त्यांचा वापर करण्यात आला आणि सत्तेवर आल्यावर सत्ताधाऱ्यांना त्यांचा विसर पडल्याची टीका आता होऊ लागली आहे. अर्थात, राज्यातील शेतकऱ्यांबाबत बोलायचे झाले तर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यापेक्षाही त्यांना कर्जातून मुक्ती कशी मिळेल हे पाहणे जास्त महत्त्वाचे आहे. गेल्या पंधरा ते वीस वर्षांच्या कालावधीमध्ये आणि त्यापूर्वी अनेक सरकारांनी हजारो लाखो शेतकऱ्यांची कर्ज माफ केली असली, तरी पुन्हा शेतकरी कर्जबाजारी होतच आहेत. खरेतर एकदा शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली की त्यांची शेती फायदेशीर करण्याच्या दृष्टिकोनातून सरकारने मदत करून इतर सर्व अनुषंगिक बाबींच्या साहाय्याने शेतकऱ्यांवर पुन्हा कर्ज घेण्याची वेळ येणार नाही, अशी अनुकूल स्थिती निर्माण करायला हवी.

जर कर्ज घेण्याची वेळ आली तर शेती फायदेशीर ठरत असल्यामुळे शेतकरी कर्जाचे हप्ते वेळेत भरेल अशी परिस्थिती निर्माण करणे हीसुद्धा सरकारचीच जबाबदारी आहे. केवळ महाराष्ट्रच नाही तर देशातील अनेक राज्यांमध्ये गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये शेतकऱ्यांना सातत्याने कर्जमाफी दिली जात आहे. पण शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याच्या दिशेने कोणत्याच भरीव अशा हालचाली केल्या जात नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी २०१४ मध्ये जेव्हा सर्वप्रथम सत्तेवर आले तेव्हा त्यांनी पाच वर्षांच्या कालावधीमध्येच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट केले जाईल अशी घोषणा केली होती. पण आता नरेंद्र मोदी आपल्या कार्यकाळाच्या तिसऱ्या टप्प्यावर असतानासुद्धा ही परिस्थिती अद्याप प्रत्यक्षात आलेली नाही, हे वास्तव विसरता येत नाही. शेतकऱ्याला शेती परवडत नाही, ती फायदेशीर ठरत नाही म्हणून त्याला कर्ज घ्यावे लागते आणि निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतीतून काही उत्पन्न मिळाले नाही तर या कर्जाचे हप्तेही फेडता येत नाहीत. साहजिकच एक सरकारी कल्याणकारी धोरण म्हणून शेतकऱ्यांना कर्जमाफी विशिष्ट परिस्थितीत देणे योग्य असले तरी त्यापेक्षा शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणे जास्त महत्त्वाचे आहे. उद्योग अथवा व्यवसाय असो कर्ज घेणे ही काही वेगळी बाब नाही. घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड करणे महत्त्वाचे असते. आज हजारो, लाखो उद्योजक आणि व्यापारी व्यावसायिकसुद्धा आपापल्या व्यवसायासाठी कर्ज घेत असतात. काही लोकांना ते कर्ज फेडता येते काही लोकांना कर्ज फेडता येत नाही. शेती हासुद्धा एक प्रकारचा उद्योगच असल्यामुळे येथील नफा-तोट्याचे गणित शेतकऱ्यालाही बघावे लागते. कमीत कमी खर्चामध्ये बियाणे खते आणि इतर अनुषंगिक बाबी उपलब्ध होणे हे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच शेतीमालाला योग्य बाजार भाव मिळणेसुद्धा महत्त्वाचे आहे. अजूनही भारतातील शेतकऱ्यांना आपल्या पिकाचे पैसे जलद मिळणे महत्त्वाचे असल्याने अनेक वेळा मध्यस्थाचाच लाभ होतो आणि शेतकऱ्यांच्या हाती फारसे काही पडत नाही. त्यातूनच त्याला कर्जाचे हप्ते भरणेसुद्धा शक्य होत नाही. अशा प्रकारे कर्ज थकले की मानसिक त्रासातून आत्महत्येचे विचार मनात निर्माण होतात. गेल्या काही वर्षांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कर्जबाजारीपणाला कंटाळूनच झाल्या आहेत हे वास्तवही नाकारून चालत नाही. अशा परिस्थितीमध्ये कर्जमाफीही महत्त्वाची असली, तरी सरकारी तिजोरीची विद्यमान स्थितीसुद्धा बघावी लागते. अजित पवार यांनी म्हटल्याप्रमाणे, किमान आणखी तीन वर्षे शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे शक्य नसेल तर या कालावधीमध्ये शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्यासाठी त्याची शेती फायदेशीर कशी ठरेल या दिशेने मात्र सरकारला प्रयत्न करावेच लागतील. राज्यात कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यरत असल्या तरी अनेक वेळा या बाजार समित्यांच्या माध्यमातून आपला शेतीमाल विकावा असे शेतकऱ्याला वाटत नाही. कारण तेथेही दलाल आणि मध्यस्थ यांचाच प्रभाव असतो.

आर्थिक दबावामुळे आणि अडचणीमुळे शेतकऱ्याला आपला शेतमाल जास्त काळ आपल्या हातात ठेवणे शक्य नसते. त्याचाच फायदा घेऊन मध्यस्थ आणि दलाल कमी भावात तो शेतमाल खरेदी करतात आणि नंतर भाव वाढल्यावर स्वतःचे उखळ पांढरे करून घेतात, हे आजवर महाराष्ट्रानेच नाहीतर देशातील अनेक राज्यांनी पाहिले आहे. साहजिकच शेतकऱ्याची शेती फायदेशीर झाली म्हणजेच त्याला त्याच्या शेतमालाचा योग्य भाव मिळाला, तर सर्व समस्यांवर उत्तर मिळू शकते. पण या मूलभूत समस्येकडे लक्ष देण्यासच कोणाला वेळ नाही. शेतकऱ्याला कर्जमाफी दिली की आपली जबाबदारी संपली या भ्रमात राजकीय नेते असल्याने शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्याच्या विषयाला कोणीच महत्त्व देत नाही. त्यामुळे राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय आपल्या निवडणूक जाहीरनाम्यापुरताच मर्यादित न ठेवता शेती फायदेशीर कशी होईल आणि त्याच्या शेतमालाला योग्य भाव कसा मिळेल याकडे लक्ष दिले, तर शेतकऱ्याला कर्जमाफी न देता त्याला कर्जमुक्त करण्याचा विचार प्रत्यक्षात येऊ शकेल.

# राज्य लोकतंत्रचा तिसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

**जालना रोडवरील हॉटेल यशराज इन येथे राज्य लोकतंत्रचा तिसरा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छांचा वर्षाव केला.**

कार्यक्रमास माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित, डॉ. योगेश क्षीरसागर, अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर, ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, उल्हास गिराम, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, प्रकाश कवठेकर, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानोबा मोकाटे, जिल्हा कारागृह अधीक्षक बक्सर मुलांनी, जिल्हा सरकारी वकील अजय राख, पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ, पोलीस निरीक्षक मारोतराव खेडकर, एपीआय सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक मिसाळ, उपनिरीक्षक जायभाय यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून राज्य लोकतंत्रच्या पत्रकारितेतील योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी राज्य लोकतंत्रने समाजातील विविध विषयांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडले असल्याचे सांगितले. आमदार संदीप क्षीरसागर यांनी प्रामाणिक आणि निर्भीड पत्रकारितेचे कौतुक केले. राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲडव्होकेट सुभाष राऊत यांनी राज्य लोकतंत्रच्या तिसऱ्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने संपादकीय टीमच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले. तसेच, पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकण्यासाठी माध्यमांची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले. कार्यक्रमात उपस्थितांनी एकत्र येऊन केक कापून आनंद साजरा केला. उपस्थित मान्यवरांनी राज्य लोकतंत्रच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि सतत सामाजिक प्रश्नांवर भाष्य करत राहण्याचे आवाहन केले. राज्य लोकतंत्रच्या संपादकीय टीमने या वर्धापन दिनाच्या निमित्ताने वाचकांसाठी अधिक विश्वासार्ह आणि निर्भीड पत्रकारिता करण्याचा संकल्प केला. या सोहळ्याला सोमनाथ बडे, सेना उपजिल्हाप्रमुख संतोष जाधव, बाबुराव पोटभरे, सिए बीबी जाधव, नगरसेवक शुभम धूत, ज्येष्ठ संपादक नरेंद्र कांकरिया, संतोष मानूरकर, वसंत मुंडे, राजेंद्र आगवान, अजित वरपे, विजयराज बंब, सुनील क्षीरसागर, शेख तय्यब, दिलीप खिस्ती, प्रताप नलावडे, उत्तम हजारे, सुभाष चौरे, सोमनाथ खताळ, दिनेश लिंबेकर, वैभव स्वामी, दीपक थोरात, राम कुलकर्णी, कल्याण कुलकर्णी, अभिजीत नखाते, नितीन चव्हाण, दीपक काळकुटे, संपादक रांजवन, राजेंद्र होळकर, अनिल भंडारी, शिरीष शिंदे, संतोष गर्जे, अनिल वाघमारे, नंदू गायकवाड, परमेश्वर खरात, दादा आदमाने, जितेंद्र शिरसाट, विलास डोळसे, अनिल डोंगरे, मोहन गुंड, ॲड. गरजे, केशव कदम, बाळासाहेब अंभोरे, बाळासाहेब कडबाने, रवी उबाळे, शेखर कुमार, नवनाथ शिराळे, मुख्याध्यापक तांदळे, संजय हंगे, मुकेश झणझणे, अतुल भालशंकर, वैभव जैन, डॉ. प्रमोद शिंदे, रमाकांत गायकवाड, शेख माजिद, आत्माराम वावळ, शिवमुर्ती वाघिरे, डॉ. घुबडे, संतोष रासवे, गोरख मेंडके, अशोक होळकर, अशोक सुखवसे, दत्ता आजबे, अर्जुन मुंडे, केशव मुंडे, बाबा देशमाने, ज्योतीराम पांढरपोटे, मनोज जाधव, सुहास पाटील, सचिन कोठुळे, शिवसेनेच्या नेत्या वर्षाताई चव्हाण, ॲड शिराळे, आनंद डोंगरे, देवीसिंह शिंदे, अनिकेत भिलेगावकर, बाळासाहेब आडागळे, पसायदान सेवा प्रकल्पाचे गोवर्धन दराडे, बालासाहेब फपाळ, डॉक्टर गणेश ढवळे, प्रचंड सोळंके, मोहन वाघ, भाऊसाहेब हंगे, संपादक जालिंदर धांडे, अनिल जाधवर, लक्ष्मण नरनाळे, श्वेता घाडगे, रामनाथ खोड, सुभाष धस, संजय मिसाळ, तत्त्वशील कांबळे, शरद रेडेकर, भीमराव गुरव, पोकळे, संदीप उबाळे, शेख शफीक, अर्जुन चाटे, दत्ता ठोंबरे, विकास मुळे, संगमेश्वर आंधळकर, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा पवार, नितीन जायभाय, बाजीराव ढाकणे,राजू महूवाले, सिद्धार्थ सोनवणे, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

# अंबाजोगाईत तरुणावर प्राणघातक हल्ला; उपचारादरम्यान युवकाचा मृत्यू

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात संतोष देशमुख हत्या प्रकरण गाजत असतानाच जिल्ह्यात जिल्ह्यात गुन्हेगारी घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना आढळून येत आहे. अशीच अंबाजोगाई शहरालगत जोगाईवाडी शिवारात पोखरी रोड वरील रामकृष्ण काळे चौकलागत सकाळी नऊ वाजता राजकुमार साहेबराव करडे (वय ३०) या तरुणावर अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने डोक्यात , पाठीवर तसेच मानेवर वार करत प्राणघातक हल्ला केला .घडलेल्या या धक्कादायक घटनेत तरुणाचा मृत्यू झाला आहे.**



अज्ञात हल्लेखोरांनी राजकुमार करडे याच्यावर धारदार शस्त्रांनी सपासप वार करून राजकुमार साहेबराव करडे (वय ३०, रा. गवळीपुरा, अंबाजोगाई) यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. जखमी तरुणास पुढील उपचारासाठी अंबाजोगाई च्या स्वा रा ती मध्ये दाखल करण्यात आले

अंबाजोगाई शहरालगत पोखरी रोडवरील सारडा नगरी जवळ आज सकाळी ९ वाजताच्या सुमारास दोन असतांना त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या राजकुमार करडे यांना तातडीने स्वाराती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. हल्लेखोरांनी त्यांच्या गळ्यावर, डोक्यावर आणि पाठीवर वार केल्याने मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाला होता, ज्यामुळे त्यांचे प्राण वाचवता आले नाहीत. दरम्यान, या हल्ल्यामागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी जुन्या भांडणातूनच हा हल्ला झाल्याचे नागरिकांतून बोलल्या जात आहे . पोलीस घटनास्थळी दाखल होऊन पंचनाम्यानंतर हल्लेखोरांचा शोध घेत आहेत. आहे. या घटनेमुळे अंबाजोगाई शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# शिरूर, गेवराई तालुक्याला पंकजाताई मुंडे यांनी दिलं विकासाचं गिफ्ट!

## सिंदफणा नदीवरील निमगाव कोल्हापूरी बंधाऱ्याच्या विस्तारासाठी २२ कोटीच्या निधीला कॅबिनेटची मान्यता

**बीड । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शिरूर कासार आणि गेवराई तालुक्याला विकासाचं गिफ्ट दिलं आहे. शिरूर तालुक्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव कोल्हापूरी बंधाऱ्याच्या विस्तारासाठी २२ कोटी तर ब्रह्मनाथ येळंब व टाकळगाव हिंगणी (गेवराई) येथील बंधाऱ्यासाठी ३७ कोटी रूपये निधीला राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.**



राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. ना. पंकजाताई मुंडे यांच्यामुळे या बैठकीत बीड जिल्ह्याला विकासाचं गिफ्ट मिळालं. जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव (ता. शिरूर, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी २२.०८ कोटी रुपये, सिंदफणा नदीवरील ब्रम्हनाथ येळंब (ता. शिरूर, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी १७.३० कोटी रुपये आणि सिंदफणा नदीवरील टाकळगाव (हिंगणी) (ता. गेवराई, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी १९.६६ कोटी रुपये अशा तीन कामांना बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

### जिल्ह्यात पाऊल ठेवण्यापूर्वीच निधी आणला

ना. पंकजाताई मुंडे उद्या २ एप्रिल रोजी बीड जिल्हयात येत आहेत. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी जिल्हयात पाऊल ठेवण्यापूर्वीच हा निधी मंजूर करून घेतल्याने शेतकऱ्यांसह जिल्हावासियांनी आनंद व्यक्त केला आहे.

# खोक्या प्रकरणात व्हिलन ठरवूनमाझ्या खुनाचा कट

## आ.सुरेशधस यांचा गंभीर आरोप

**आष्टी । प्रतिनिधी**

**सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या प्रकरणातून माझी राजकीय कारकीर्द धोक्यात आणून प्रसंगी हरणाच्या शिकारी बाबत विपरीस्थ वक्तव्य करून विष्णूई समाजाच्या समोर मला विलन ठरवून माझ्या कोणाचा कट रचण्यात आला होता असा गंभीर आरोप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. आष्टी येथे पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.**

बीड जिल्ह्यातील काही बिनकामी जनमानसातून बाद झालेले पुढारी एकत्रित येऊन माझ्या बदनामीसाठी प्रयत्न करत होते त्यातच सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या कारवाईमुळे चर्चा सुरू झाली आणि माझ्या बदनामीचा आणि त्यातून माझ्या हत्येचा कट सचण्यात आला कारण काळवीट आणि हरियाण हे वैष्णवी समाजाचे दैवत समजले जाते या हरणाच्या शिकारी बाबत सतीश भोसले यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून त्याला अटक करण्यात आली आहे त्याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना काही महाभागांनी सतीश भोसले हा आदिवासी समाजातील असून हरिणाची शिकार करून सुरेश धस यांना पुरवतो, असे बिष्णोई समाजाला सांगण्यात



आले होते त्यातून बिश्नोई समाजा समोर मला विलन ठरवण्याचा प्रयत्न झाला आणि त्यातून माझा खून करण्यासाठी या समाजातील काही व्यक्तींना राजस्थानवरून विमानाने मुंबईत आणण्यात आले होते. मला मारण्यासाठीच मुंबईत आणले असल्याचा दावा सुरेश धस यांनी केला आहे. आष्टी येथील औव्दैतचंद्र निवासस्थानी मंगळवार (दि.१)रोजी सायंकाळी ५ वा.आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत आ.धस बोलत होते.यावेळी ते पुढे बोलतांना आ.धस म्हणाले,जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण उचलून धरले होते.या संपूर्ण प्रकरणात राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. यामुळेच मंत्री धनंजय मुंडे यांना देखील राजीनामा द्यावा लागला आहे.या सर्व घटनांदरम्यान सतीश भोसले उर्फ खोक्या भोसले या सुरेश धस यांच्या कार्यकर्त्यांवर देखील अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत.सतीश भोसलेला अटक देखील करण्यात आली.सतीश भोसले हा हरिणाची शिकार करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या माध्यमातून आपल्याला जिवे मारण्याचा कट रचण्यात आला होता, असा आरोप सुरेश धस यांनी केला आहे.सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या माध्यमातून सुरेश धस हे हरणांचे मांस खात असल्याचे पसरवण्यात आले.बिष्णोई समाजाला सुरेश धस यांना हरणाचे मास कसे पुरवले जात होते, हे पटवून सांगण्यात येत होते असे देखील सुरेश धस यांनी म्हटले आहे ते पुढे म्हणाले, इतक्या खालच्या दर्जाचे राजकारण बीडमध्ये जे सुरू आहे ते योग्य नाही. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि तृप्ती देसाई यांना इथल्या खाचा-खोचा माहिती नाहीत. त्या काही पण बोलतात.खोक्याच्या प्रकरणात हे अडचणीत..अरे कशाचे अडचणीत? माझा काय संबंध त्याच्याशी? तो त्याचा शिक्षा भोगत आहे.त्याच्याशी माझा काहीही संबंध नाही परळीचा राजकारणात बाद ठरलेले बिनकामी पुढारी आष्टी मतदार संघात बोलवून त्यांच्या तोंडून माझी बदनामी करण्याचे षडयंत्र देखील रचण्यात आले होते या सर्व प्रकरणाचे योग्य वेळी योग्य ठिकाणी मी पुरावे सादर करीन आणि याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांकडे रीतसर तक्रार करणार आहे असेही ते शेवटी म्हणाले.

# पाटोद्यात बर्डफ्लूचा शिरकाव

## बस स्थानक परिसर व न्यायालय परीसर सतर्क क्षेत्र म्हणून घोषित

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा येथील बस स्थानक परिसर व न्यायालय परिसरामध्ये मृत कावळ्यांचे बर्ड फ्लू ( ५१) करिता पाठवलेले नमुन्याचे निष्कर्ष होकारार्थी आलेले असल्यामुळे सदर रोगाचा प्रसार जिल्ह्यात इतर ठिकाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या करिता प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ (२००९) मधील तरतुदी नुसार पाटोदा ता पाटोदा जि बीड येथे सर्वेक्षणाचे काम पूर्ण होई पर्यंत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यावशक झाले आहे.**

त्याअर्थी, मी श्री अविनाश पाठक, भा.प्र.से. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड, प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ ( , २००९) व ( २०२१) मधील तरतुदीनुसार पाटोदा येथील १० कि. मी. त्रिज्येतील ( १० ) क्षेत्र ''सतर्क क्षेत्र ( )'' म्हणून घोषित करून खालीलप्रमाणे आदेश देत आहे.१. बाधित क्षेत्राच्या ठिकाणी नागरिकांच्या नैमित्तिक प्रवाशांशिवाय हालचालीस व इतर पक्षी व प्राण्यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात येत आहे आणि त्या ठिकाणची खाजगी वाहने बाधित परिसराच्या बाहेर लावण्यात यावीत. २. पाटोदा शहरातील बाधित परिसराची २% सोडीयम हायपोक्लोराइट किंवा पोटॅशिअम परमॅग्रेट (२ % /४) च्या द्रावणाने निर्जंतुकीकरण करावे. तसेच चुन्याची फक्की मारावी. ३. प्रभावीत क्षेत्राच्या १० कि.मी. त्रिज्येतील कुक्कुट पक्षांचे सर्वेक्षण करून, नमुने प्रयोगशाळा तपासणी साठी पाठवावेत ४. या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बीड यांना आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत, आरोग्यविभाग, पोलीसविभाग, महसूल विभाग, ग्रामविकास विभाग, वन विभाग, जलसंपदा विभाग, बांधकाम विभाग व परिवहन विभाग इत्यादी विभागानी आवश्यक मनुष्यबळ, यंत्र व साधन सामुग्री यांचा पुरवठा करावा. ५. पशुसंवर्धन विभाग, ग्रामपंचायत आरोग्य विभाग, पोलीसविभाग, महसूल विभाग, वन विभाग, जलसंपदा व परिवहन विभाग इ. विभागाची प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ ( २००९) व ( २०२१), आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ मधील तरतुदीनुसार पाटोदा येथील बाधित क्षेत्रापासून ० ते १ कि.मी. त्रिज्येच्या बाधित क्षेत्रात व १ ते १० कि. मी. त्रिज्येच्या सर्वेक्षण क्षेत्रात कार्यवाही करावी. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी असे आदेश जिल्हाधिकारी बीड.यांनी देण्यात आली आहेत

पान १ वरून...

### २५ अधिकाऱ्यांनी राज्याचे

आरोपही धस यांनी केला. या लोकांच्या बँक स्टेटमेंट तपासल्यास अनेक बाबी उघड होतील. राज्यात कृषीमंत्री कोणी असले तरी त्यांना शिकवण्यास हेच होते, असे ते म्हणाले.

**मुख्यमंत्र्यांकडे करणार मागणी**

किरण जाधव यांनी दिलेल्या अकरा कंपन्यांचे परवाने तपासण्यात यावे. या अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी एसीबीकडून करण्यात यावी. गेल्या पंधरा वर्षातील त्यांच्या आर्थिक व्यवहाराची तपासणी आयकर विभागाकडे करण्यात यावी, अशी मागणी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहोत, असे आमदार धस यांनी म्हटले.

**बिश्नोई गँग मार्फत माझा काटा काढण्याचा कट -आ. सुरेश धस**

सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या माध्यमातून आता काही लोक मला जाणीवपूर्वक टार्गेट करत आहेत. माझा बिश्नोई गँगकडून काटा काढण्याचा कट रचला जात असून, त्या टोळीच्या तरुणांना मुंबईत आणले आहे, असा गौप्यस्फोट करत खोक्याच्या घरात सापडलेले मांस मी खातो, तो मला डब्बे आणून देतो, असा जावई शोध काही जणांनी लावला आहे. परंतु, खोक्याचा आणि माझा काहीही संबंध नाही, असा खुलासा भाजप आमदार सुरेश धस यांनी मंगळवारी (दि.१) पत्रकार परिषदेत केला. धस म्हणाले की, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण मी उचलून धरले, हा माझा गुन्हा आहे का? एका पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणे, हा गुन्हा असेल तर हो मी हा गुन्हा केला आहे. त्यासाठी मला कोणत्याही शिक्षा द्या, परंतु यासाठी मी दहा वेळा लढा देण्यास तयार आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. मी माझे काम थांबविणार नाही. या सर्वांच्या मागे कोण आहे, कोण बिश्नोई पर्यंत हा विषय नेतो, हे सर्व मला माहीत असून यावर टप्पा टप्प्याने आपण बोलणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या प्रकरणात अत्यंत खालच्या दर्जाचे राजकारण करणे उचित नाही. मात्र बीड जिल्ह्यात चाललेल्या या प्रकारामुळे वाईट वाटते, अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**तृप्ती देसाई, अंजली दमानिया यांनी अर्धवट माहिती**

अंजली दमानिया आणि तृप्ती देसाई यांनी सुरेश धसांचे आरोप एक स्टंटबाजी असल्याचे म्हटले. यावर प्रतिक्रिया देतांना दमानिया आणि देसाई यांना धस यांनी फटकारले. अंजली दमानिया आणि तृप्ती देसाई यांना बीड जिल्ह्याच्या राजकारणातील खाचा-खोचा माहिती नाही. त्यांनी कशावर काय बोलावे, ते काहीही बोलतात. खोक्याच्या प्रकरणात सुरेश धस अडचणीत आले असे म्हणतात. त्या अर्धवट माहितीच्या आधारे आपल्यावर आरोप करत आहेत, असे ते म्हणाले.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. २ एप्रिल २०२५


## चौसाळा येथील चंदन शहावली बाबाच्या उरुसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



चौसाळा : चौसाळा तालुका बीड येथील हिंदू मुस्लिम बांधवांचे प्रतीक असलेल्या चौसाळा परिसरातील नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या चंदन शहावली बाबा या देवस्थानाच्या प्रतिवर्ष प्रमाणे यावर्षीही उरूस मोठ्या उत्साहाने साजरा होणार आहे उरूस निमित्ताने दिनांक ३ ४ २०२५ रोजी संदल व रात्री ब्रास ब्रांड चा मुकाबला दिनांक ०४ ०४ २०२५ रोजी साई स्क्रीन हॉस्पिटलच्या वतीने मोफत त्वचारोग तपासणी शिबिर व रात्री शोभेची दारू दिनांक ०५ ४ २०२५ शनिवारी दुपारी कुस्त्याचा जंगी फड व शेवटच्या निकालाची ११११११ ची होऊन सांगता होईल त्याचप्रमाणे ९ ४ २०२५ रोजी बुधवारी रात्री ह भ प शिवलीला ताई पाटील यांचे सुश्राव्य हरिकीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे सर्व पंचक्रोशीतील भाविक नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आव्हान चौसाळा ग्रामस्थांनी केले आहे

# पाटोदा नगरपंचायत नगरसेवक अपात्रता प्रकरण जिल्हाधिकाऱ्यांकडून दुसऱ्या जिल्हाधिकाऱ्याकडे वर्ग करण्यासाठी उच्च न्यायालयाची नोटीस

**पाटोदा । प्रतिनिधी**

नगरपंचायत चे नगरसेवक सय्यद अब्दुल्ला सय्यद यासीन तसेच बळीराम बाबासाहेब पोटे यांनी त्यांच्या पाटोदा नगरपंचायतच्या नगरसेवक कालावधीमध्ये त्यांच्या स्वतःच्या मुलांना नगरपंचायत पाटोदा यांच्या वतीने करण्यात येणारे विविध लोक उपयोगी कामांमध्ये कॉन्ट्रॅक्ट दिल्यामुळे व पाटोदा नगरपंचायत च्या ऑडिटमध्ये तत्कालीन नगरसेवक व ठेकेदार यांच्यावर रकमा व सुलीचे निर्देश असल्यामुळे पाटोदा येथील शेख मोबीन शेख हमीद, अब्लूक हिराजी घुगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष शिवभूषण लक्ष्मणराव जाधव यांनी जून २०२३ मध्ये जिल्हा अधिकारी, बीड यांच्या कार्यालयात, महाराष्ट्र नगरपालिका नगरपंचायत कायदा १९६५ कलम १६()(), ४(३), प्रमाणे अपात्रतेचे जल्हाधिकारी बीड यांच्याकडे प्रकरणे दाखल करून सय्यद अब्दुल्ला सय्यद यासीन व बळीराम बाबासाहेब पोटे, यांना पाटोदा नगरपंचायत चे नगरसेवक म्हणून अपात्र करण्याची विनंती केली होती.

सदरील प्रकरणांमध्ये दिनांक १२/०३/२०२४ रोजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यापुढे सुनावणी होऊन सदरील प्रकरणने निकालासाठी राखीव करण्यात आले होते. परंतु सदरील प्रकरणात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी ऑगस्ट २०२४ पर्यंत कुठलाही निकाल दिलेला नाही. त्यानंतर २१/०८/२०२४ रोजी शेख मोबीन, अबलूक घुगे, व शिवभूषण जाधव यांनी सचिव शहर विकास विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त छ. संभाजीनगर यांना लेखी अर्ज देऊन वरील अपात्रतेच्या प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडून न्याय मिळवण्याची शंका व्यक्त करून जिल्हाधिकारी पाठक साहेब यांनी बीड जिल्ह्यामध्ये अनेक वर्षापासून काम केल्यामुळे सय्यद अब्दुल्ला जो की राजकीय दृष्ट्या प्रभावी असून तो माजी बीड जिल्हा परिषद अध्यक्ष आहे. तसेच बळीराम पोटे प्रभावी राजकारणी आहे. दोघेही भारतीय जनता पार्टी माजी मंत्री आ.सुरेश धस यांच्या जवळचे असून दोघांचेही जिल्हा अधिकारी पाठक साहेब यांच्याबरोबर संबंध आहेत. अशी चर्चा अब्दुल्ला व बळी पोटे यांचे कार्यकर्ते करत असून काहीही करून कुठल्याही मार्गाने पाठक साहेब यांच्याकडून वरील दोन्ही अपील ते खारीज करून घेणार अशा बावड्या पाटोदा शहरांमध्ये आहे. असे त्या अर्जामध्ये नमूद करून व पाठक साहेब यांच्याकडून न्याय मिळवण्याची शंका निर्माण झाल्यामुळे दोन्ही अपील दुसऱ्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करून त्या सुनावणीचा टाईम बॉण्ड करून प्रकरणाचा निकाल देण्यात यावा, अशी विनंती केली होती. परंतु सचिव शहर विकास विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई व विभागीय आयुक्त छ.संभाजीनगर यांनी सदरील अर्जावर कुठलीही कारवाई न केल्यामुळे शेख मोबीन शेख हमीद व शिवभूषण लक्ष्मणराव जाधव यांनी मार्च २०२५ मध्ये माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये याचीका क्रमांक. ३९०१ व ३९०८/२०२५ दाखल करून जिल्हाधिकारी बीड यांनी सदरील प्रकरणांमध्ये एक वर्षाचा कालावधी लोटूनही निकाल न दिल्याने कायद्यामध्ये अपात्रतेच्या तरतुदीचा मूळ आदेश भंग होत असून जिल्हाधिकारी पाठक यांच्याकडील वरील दोन्ही प्रकरणे औरंगाबाद महसूल विभागातील दुसऱ्या कोणत्याही जिल्हाधिकारी यांच्याकडे वरील प्रकरणे वर्ग करावे अशी विनंती केली आहे. सदरील याचिकांची सुनावणी दि. २५/०३/२०२५ रोजी माननीय न्यायमूर्ती मंगेश पाटील व मा. न्यायमूर्ती खोब्रागडे यांच्या खंडपीठा पुढे झाली असता मा.उच्च न्यायालयाने सदरील प्रकरणात सचिव शहर विकास महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त औरंगाबाद, जिल्हाधिकारी बीड तसेच सय्यद अब्दुल्ला सय्यद यासीन व बळी बाबासाहेब पोटे यांना नोटीस काढल्या असून जिल्हाधिकारी बीड यांनी सदरील अपात्रतेच्या प्रकरणांमध्ये अंतिम आदेश पारित करू नये, असे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक १५/०४/२०२५ रोजी ठेवलेली आहे. याचिकाकर्त्याच्या वतीने ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी काम पाहिले व त्यांना ॲड. सोनाली सोमवंशी, ॲड. रवींद्र वानखेडे, ॲड. गौरव खांडे यांनी सहकार्य केले.



**माजलगाव:– रमजान ईद निमित्त शहरातील मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देताना मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक (आबा) डक**

## शृंगेरी देवीच्या पूजेचा लिलाव २५ लाख ५५ हजार रुपये ; देवस्थानच्या विकासाला चालना मिळणार

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील ब्रह्मगाव येथील शृंगेरी देवी देवस्थानच्या देवस्थान समिती आणि ग्रामस्थांचे बैठक संपन्न झाले. या बैठकीत शृंगेरी देवीच्या वर्षभराच्या पूजेचा लिलाव २५ लाख ५५ हजार रुपये इतका झाला असून या लिलावामुळे देवीच्या उत्पन्नामध्ये वाढ झाल्याने देवस्थान परिसरामध्ये विकास कामे होणार असल्याचे बोलले जात आहे.

आष्टी आणि पाटोदा तालुक्याच्या सीमेवर असलेल्या शृंगेरी देवी देवस्थानची देवस्थान समिती आणि ग्रामस्थांची वार्षिक बैठक सोमवार दिनांक ३१ मार्च रोजी संपन्न झाली. या बैठकीमध्ये शृंगेरी देवीच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी देवीची पुजा, देवीची जमीन आणि इतर उत्पादनाच्या स्रोतांचा लिलाव करण्यात आला. यामध्ये देवीच्या मुख्य पूजेचा लिलाव हा एक वर्षासाठी २५ लाख ५५ हजार रुपयांचा, शृंगेरी देवी देवस्थानच्या मालकीच्या जमिनीचा लिलाव पाच वर्षासाठी १लाख ३० हजार रुपये तर इतर उत्पन्न स्रोतांचा एक वर्षासाठी १ लाख ६० हजार रुपयांचा निलाव झाला. लिलावाच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातून शृंगेरी देवी देवस्थान विकास होण्यास उपयोग करण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. या



लिलावाला शृंगेरी देवी देवस्थान चे अध्यक्ष विजय हराळ, उपाध्यक्ष सुनील सानप, सरपंच रोहिदास पवार, माजी सरपंच राजाभाऊ निंबाळकर, माजी सरपंच संदीप पानसांडे, माजी सरपंच संदीप सानप, दत्तात्रय निंबाळकर, सोपान बापू पवार, राजेंद्र काका हराळ, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी सानप, संजय नाना हराळ, मारुती पवार, महेश वैद्य, भाऊसाहेब पवार, माजी मुख्याध्यापक परमेश्वर पवार, मुकादम अशोक सानप, मुकादम सुरेश सानप, अमोल हराळ, चेअरमन नितीन हराळ परमेश्वर शिंदे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्या ग्रामस्थांनी देवीच्या पूजेचा लिलाव घेतला आहे त्यांनी मंदिराचे पवित्र राखावे यासाठी मंदिर सकाळी सात वाजता दर्शनासाठी उघडावे व रात्री सात नंतर बंद करण्यात यावे. त्याच बरोबर सकाळ दुपार आणि संध्याकाळची आरती वेळेत घ्यावे, तसेच शृंगेरी देवी मंदिराचे स्वच्छता राखण्याची जबाबदारी ज्यांनी पूजेचा लिलाव घेतला आहे त्यांच्याकडे राहणार असल्याची माहिती शृंगेरी देवी देवस्थानचे अध्यक्ष विजय हराळ यांनी सांगितले आहे.

# असा रंगला दै. राज्य लोकतंत्रचा वर्धापनदिन सोहळा















राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.२ एप्रिल २०२५


# टोमॅटोचा लाल चिखल!

## प्रतिकिलोला मिळतोय फक्त एक ते दोन रुपयांचा दर ;शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका

सध्या टोमॅटो उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. कारण टोमॅटोच्या दरात मोठी घसरण झाली आहे. याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. सध्या शेतकऱ्याच्या टोमॅटोला बाजारात प्रतिकिलोसाठी एक ते दोन रुपयांचा दर मिळत आहे. एवढा कमी भाव मिळाल्याने शेतकरी निराश झाला आहे. हरियाणासह महाराष्ट्रातील शेतकतरी चिंतेत आहेत.

**शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण**

हरियाणातील कर्नालमध्ये व्यापारी टोमॅटोला २ रुपये भाव देत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचं मोठं आर्थिक नुकसान होत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. टोमॅटो पिकवण्यासाठी अनेक शेतकऱ्यांचा एक लाख रुपयांच्या पुढे खर्च झाला आहे. सध्या टोमॅटो दोन रुपये किलोने विकला जात आहे. कमी दरी मिळत असल्यानं शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही भरून निघत नाही.

**एक क्रेट ५० रुपयांना विकला जातोय**

बाजारातील एका शेतकऱ्याने दिलेल्या



माहितीनुसार, टोमॅटोचे पीक बाजारात आणले होते. संपूर्ण हंगामात टोमॅटोची अवस्था अत्यंत वाईट होती. टोमॅटो दोन रुपये किलोनेही विकला जात नाही. टोमॅटोचे भाव वाढले की प्रकरण संसदेत जाते, असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र यावेळी टोमॅटोची अवस्था अशी आहे की तो दोन रुपये किलोने विकला जात आहे. अनेक शेतकरी आपल्या शेतातील टोमॅटोचे पीक वाया घालवत आहेत. पुढच्या पिकासाठीही पैसे नाहीत, अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली. यावेळी मजुरांची मजुरीही पिकातून निघत नाही. मजुरांची रोजंदारीही २५० रुपये असल्याचे ते सांगतात. मात्र त्यांचा एक क्रेट ५० रुपयांना विकला जात आहे. बाजारात टोमॅटोच्या या अवस्थेने शेतकरी अडचणीत सापडला आहे.

**राज्यातील अनेक भागात भाजीपाल्याचे दर कोसळले**

राज्यातील अनेक भागात भाजीपाल्याचे दर कोसळले आहेत. उन्हाळा आला असताना विविध भाज्यांचे दर दोन रूपयांपर्यंत घसरले आहेत. बटाटे, कांदा, टोमॅटो, कोथिंबीर, मिरचीला मोठा भाव नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. त्यांचा खर्चही निघत नसल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. शेतातील खत, बियाणे, मजुरी याचा प्रचंड खर्च असूनही बाजारात भाजीपाला अवघ्या ३ ते १२ रुपये किलो दरानं शेतकऱ्याला विकावा लागत आहे. दर घसरल्याने ग्राहकांची चांदी झाली आहे.

## तीन महीने उन्हाळा तापदायक ठरणार

### एप्रिलमध्ये महाराष्ट्रात जास्त ऊन आणि पावसाचा अंदाज



पुणे : यंदाच्या उन्हाळा हंगामात म्हणजेच एप्रिल ते जून या तीन महिन्यांमध्ये देशाच्या बहुतांश भागात कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. म्हणजेच ऊन यंदा तापदायक ठरणार आहे. हे तीन महीने महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत उन्हाचा चटका तापदायक ठरणार तर आहेच शिवाय राज्यात तीव्र उष्ण लाटा येण्याचा इशाराही हवामान विभागाने दिला. तसेच एप्रिल महिन्यात महाराष्ट्र अधिक तापण्याची शक्यता असून पावसाचाही अंदाज असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा उन्हाळा हंगामातील म्हणजेच एप्रिल ते जून या तीन महिन्यातील तापमानाचा अंदाज सोमवारी जाहीर केला. उन्हाळ्यात शाच्या बहुतांश भागांत सरासरीपेक्षा अधिक तापमान राहण्याची शक्यता अधिक आहे. दक्षिण भारताचा पश्चिमेकडील भाग, पूर्व-मध्य आणि पूर्व भारतात कमाल तापमान सरासरीजवळ राहणार आहे.

देशाच्या बहुतांश भागात किमान तापमानही सरासरीच्या वरच राहण्याची शक्यता अधिक आहे. एप्रिल महिन्यात राज्यासह देशाच्या बहुतांश भागांत कमाल तापमान सरासरीच्या वर राहण्याची शक्यता अधिक आहे. यात सलग २ ते ५ दिवस कालावधीच्या उष्ण लाटा अनुभावायला मिळण्याची शक्यता आहे. उत्तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तीव्र उष्ण लाटांचा इशारा आहे. तर मराठवाडा आणि विदर्भातही काही प्रमाणात उष्ण लाटा दिसून येतील. गुजरात, तसेच पूर्व किनारपट्टी आणि पूर्व भारतातही उष्ण लाटांचा इशारा आहे.

तर देशात सरासरी इतक्या म्हणजेच ८८ ते ११२ टक्के पावसाची शक्यता आहे. दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागांत सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक पावसाची, तर विदर्भसह उर्वरित महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता असल्याने हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

## थारपारकर जातीची गाय दररोज १८ लिटर दूध देण्यास सक्षम

थारपारकर ही त्याच्या विशेष गुणांमुळे दुग्ध व्यवसायासाठी अतिशय उपयुक्त प्राणी आहे. वास्तविक, या जातीच्या गायीमध्ये ४५ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त तापमानात जास्त दूध देण्याची क्षमता असते. प्रतिकूल परिस्थितीतही त्याच्या उत्पादन कार्यक्षमतेत काही फरक पडत नाही. जिथे वाढत्या तापमानासह, इतर जातीच्या गाई आणि जनावरांचे दूध उत्पादन २० ते ३० टक्के कमी होते. त्याच वेळी, ही जाती प्रतिकूल परिस्थितीतही अधिक दूध देण्यास सक्षम आहे. त्याची उत्पादनक्षमता इतर जातींपेक्षा चांगली आहे. ती आयुष्यभर १५ मुलांना जन्म देऊ शकते, तर इतर जातींच्या गायी ५ ते १० मुलांना जन्म देऊ शकतात. उष्ण आणि कोरडे हवामान सहन करण्यास सक्षम, या जातीचे आयुष्य २५ ते २८ वर्षे आहे.

**या राज्यात आढळतात थारपारकर :**

ही जात मूळ राजस्थान राज्यातील आहे, ती येथे बाडमेर, जैसलमेर, जोधपूर, जालौन आणि सिरोही भागात आढळते. वास्तविक राजस्थानचा हा वाळवंट प्रदेश आहे, तो थार वाळवंट म्हणून ओळखला जातो. यामुळेच गायीच्या जातीला थारपारकर असे नाव पडले. थारमध्ये आढळणाऱ्या गायींना थारपारकर म्हणतात.



राजस्थानमध्ये याला मालानी या नावानेही ओळखले जाते. राजस्थान व्यतिरिक्त, देशाच्या विविध भागांमध्ये त्याचे संगोपन केले जाऊ शकते. पुण्याचे क्लब ऑफ वृंदावन थारपारकरमधील चंद्रकांत भरेकर सांगतात की ते गेल्या ५ वर्षांपासून थारपारकरांचे अनुसरण करत आहेत. त्याच्या क्लबमध्ये या जातीच्या १०० पेक्षा जास्त गायी आहेत. ज्यामध्ये अनेक गायी एकावेळी १६ ते १८ लिटर दूध देतात.

**प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहेत :**

आपणा सर्वांना माहित आहे की राजस्थानचे थार वाळवंट एक उष्ण क्षेत्र आहे, येथील तापमान ५२ अंश सेल्सिअस पर्यंत नोंदवले गेले आहे.हिवाळ्यात तापमान शून्य अंशांवर पोहोचते. अशा परिस्थितीत या जातीची गाय उच्च व कमी तापमानाचा सामना करण्यास सक्षम आहे.

राजस्थानच्या उष्ण हवामानात टिकून राहण्यास सक्षम, थारपारकर इतर प्रांतांमध्ये सहजपणे पाळले जाऊ शकते.थारपारकर गायीची ओळख : थारपारकर पांढरा आणि जाड डोळ्यांचा आणि दिसायला अतिशय सुंदर आहे. देशी जातीची गाय दिसायला सुंदर आहे, पण या जातीची स्वतःची वेगळी ओळख आहे. जरी ते दिसायला पांढरे असले तरी हिवाळ्यात त्याच्या शरीरावर काळे केस वाढत असतात. थारपारकरचे डोके मध्यम आकाराचे असते आहे, कपाळ रुंद आहे आणि कपाळ उंच असते. या गायींची उंची सहिवाल आणि राठी जातीच्या गायींपेक्षा किंचित जास्त असते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७९ : औरंगजेबाने हिंदूवर 'जिझिया' कर लावला.
१८७० : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' यांच्या प्रेरणेने पुणे सार्वजनिक सभेची स्थापना झाली.
१८८५ : मध्ये स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मूळ 'पुणे सार्वजनिक सभा' आणि 'बॉम्बे असोसिएशन' या संस्थांमध्ये आहे असे मानले जाते.
१८९४ : छत्रपती राजार्षी शाहू महाराज यांचा राज्याभिषेक झाला.
१९७५ : कॅनडामध्ये जगात सर्वात जास्त उंचीचा म्हणजे ५५५.३५ टॉवर बांधून पुर्ण झाला.
१९८२ : फॉकलंडचे युद्ध - अर्जेंटिनाने फॉकलंड बेटे पादाक्रांत केली.
१९८४ : सोयुझ टी-११ या अंतराळयानातुन राकेश शर्मा या पहिल्या भारतीय अंतराळवीराने उड्डाण केले. तो ७ दिवस २१ तास व ४० मिनिटे अवकाशात होता.
१९८९ : ताणलेले संबंध सुधारण्यासाठी रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांचे क्यूबातील हॅवाना येथे आगमन
१९९० : स्मॉल इन्डस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाची स्थापना
१९९८ : कोकण रेल्वेवरून धावणारी निजामुद्दीन तिरुअनंतपुरम राजधानी एक्स्प्रेस या गाडीचा प्रारंभ झाला.
२०११ : अठ्ठावीस वर्षांच्या कालखंडानंतर भारतचा क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत विजयी.
२०११ : क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत भारताचा २८ वर्षांच्या कालखंडानंतर विजय.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१८ : फ्रॅन्सिस्को मारिया ग्रिमाल्डी - इटालियन गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २८ डिसेंबर १६६३)
१७८१ : स्वामीनारायण, भारतीय धर्मगुरू.
१८०५ : हान्स अँडरसन - डॅनिश परिकथालेखक (मृत्यू: १८७५)
१८७५ : वॉल्टर ख्राइसलर - 'ख्राइसलर' कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १८ ऑगस्ट १९४०)
१८८२ : प्रसिध्द कादंबरीकार नाथमाधव.
१८९८ : हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय - हिन्दी चित्रपटांतील प्रसिद्ध चरित्र अभिनेते. त्यांच्या 'साहिब, बिबी और गुलाम', 'बावर्ची' इ. चित्रपटांतील भुमिका विशेष गाजल्या. ते कवी (इंग्रजी), नाटककार, संगीतज्ञही होते. (मृत्यू: २३ जून १९९० मुंबई, महाराष्ट्र)
१९०२ : बडे गुलाम अली खाँ ऊर्फ 'सबरंग' - पतियाळा घराण्याचे गायक व वीणावादक, त्यांच्या 'याद पियाकी आये', 'का करु सजनी' इ. ठुमर्या लोकप्रिय आहेत. (मृत्यू: २५ एप्रिल १९६८ हैदराबाद, तेलंगण)
१९१४ : भारताचे पहिले फील्डमार्शल जनरल माणकेशा.
१९२६ : सूर्यकांत रामचंद्र खांडेकर - कवी व गीतकार (मृत्यू: १५ जून १९७९)
१९४२ : भारतीय इंग्रजी-अभिनेते रोशन सेठ यांचा जन्म.
१९६२ : जयाप्रदा - प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्री व संसद सदस्य.
१९६५ : नाझिया हसन, हिंदी पॉप गायिका.
१९६९ : हिंदी चित्रपट अभिनेता अजय देवगण यांचा जन्म.
१९७२ : भारतीय नृत्यदिग्दर्शक रेमो डिसूझा यांचा जन्म.
१९८१ : भारतीय स्टँड-अप कॉमेडीयन कपिल शर्मा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२० : पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ.
१८७२ : सॅम्युअल मोर्स - 'मोर्स कोड' व तारायंत्राचे जनक आणि चित्रकार (जन्म: २७ एप्रिल १७९१)
१९९२ : आगाजान बेग ऊर्फ आगा - आपल्या निखळ विनोदानी रसिकांच्या पसंतीस उतरलेले अभिनेते
१९३३ : के. एस. रणजितसिंहजी - कसोटी क्रिकेट खेळाडू व महाराजा, यांच्या स्मरणार्थ १९३४ पासून 'रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा' खेळल्या जातात. (जन्म: १० सप्टेंबर १८७२)
२००५ : पोप जॉन पॉल (दुसरा) (जन्म: १८ मे १९२०)
२००९ : गजाननराव वाटवे - गायक व संगीतकार (जन्म: ८ जून १९१७).

## कांदा पिकावरील हा आहे सर्वात धोकादायक रोग

राज्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन घेतले जाते. कांदा पिकाचे उत्पादन घेताना शेतकऱ्यांना अनेक औषध फवारण्या कराव्या लागतात. मात्र, कांदा पिकावरील रोग नियंत्रण करण्यात शेतकऱ्यांना अपेक्षित यश मिळत नाही. कांद्यावरील सर्व रोगांमध्ये पीळ रोग हा सर्वात धोकादायक रोग मानला जातो. कांदा लागवडीनंतरच्या पहिल्या टप्प्यात हा रोग आढळून येतो. ज्यामुळे लागवडीनंतर ऐन कांदा रोप पीक अवस्थेत पदार्पण करत असताना, कांद्यावर हा रोग दिसून येतो. परिणामी, एकरी उत्पादनात मोठी घट होण्यास हा रोग कारणीभूत ठरतो.

कांदा हे राज्यातील महत्त्वाचे पीक आहे. याशिवाय देशातील अनेक राज्यांमध्ये कांद्याचे उत्पादन घेतले जाते. प्रामुख्याने वर्षातून तीन वेळा कांदा लागवड केली जाते. कांदा हा शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये वापरला जातो. कांद्यामध्ये अनेक पौष्टिक आणि औषधी गुणधर्म देखील आढळतात. त्यामुळे त्याची मागणी कायम आहे. उत्पादन थोडे कमी झाले की भाव वाढतात? मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांपासून प्रतिकूल हवामान आणि योग्य भाव न मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पीळ रोगाची लक्षणे : कांद्यावरील पीळ रोगाची सुरुवातीची लक्षणे म्हणजे पानांवर पिवळे ठिपके पडतात. जे पानाच्या संपूर्ण भागावर पसरतात. या रोगाला ट्विस्टर किंवा स्प्रिंग असेही म्हणतात. कोलेटोट्रिचम बुरशीचे फिलामेंटस जमिनीत वर्षानुवर्षे आणि प्रभावित पिकांच्या अवशेषांमध्ये महिने टिकून राहू शकतात.

ज्यामुळे याचा संपूर्ण कांदा पिकावर विपरीत परिणाम होऊ शकतो. कांदा पिकावरील पीळ रोगाचे मुख्य कारण म्हणजे थ्रिप्स कीटक आहेत. कांदा पिकावर थ्रीप्स किडीचा प्रादुर्भाव असल्यास, हे थ्रिप्स कांद्याच्या मऊ भागांना संक्रमित करतात आणि त्यानंतर त्या ठिकाणी बुरशीची वाढ सुरू होते. आणि कांद्याच्या पिकावर पीळ रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.

पीळ रोग नियंत्रणासाठीचे उपाय : कांदा पिकासाठी पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन निवडावी. कांद्याचे प्रमाणित बियाणे वापरावे. ज्यामुळे रोग नियंत्रणास मदत होते. २ किंवा ३ वर्षांनी पिकांची आलटून पालटून लागवड करावी. ज्यामुळे जमिनीची उपयुक्तता टिकून राहते. लागवड करताना रोपांच्या योग्य अंतरासाठी काळजी घ्या. मातीची परिक्षणासह खतांचा योग्य वापर करावा.

## उन्हाळी कोथिंबीर लागवड तंत्रज्ञान

कोथिंबीरीची लागवड भारतातील बहुतेक सर्व राज्यात केली जाते. कोथिंबीरीच्या विशिष्ट स्वादयुक्त पानांसाठी कोथिंबीरीला वर्षभर मागणी असते. मात्र कोथिंबीरीची लागवड प्रामुख्याने खरीप आणि रब्बी हंगामात केली जाते. उन्हाळी हंगामात कोथिंबीरीचे उत्पादन कमी असले तरी मागणी मात्र भरपूर असते. त्यामुळे कोथिंबीरीच्या लागवडीस चांगला वाव आहे. कोथिंबीर ही रोजच्या आहारात वापरली जाणारी महत्वाची पालेभाजी आहे. कोथिंबीरीच्या विशिष्ठ स्वादयुक्त पानावर इतर भाज्यांचा स्वाद वाढविण्यासाठी शाकाहारी तरी मांसाहारी पदार्थामध्ये कोथिंबीरीचा वापर करण्यात येतो. कोथिंबीरीच्या वडया चटणी आणि कोशिंबीर लोकप्रिय आहे.

हवामान आणि जमीन : कोथिंबीरीची लागवड कोणत्याही प्रकारच्या हवामानात करता येते त्यामुळे अतिपावसाचा प्रदेश वगळता महाराष्ट्रातील हवामानात वर्षभर कोथिंबीरीची लागवड करता येते. उन्हाळयात तापमान ३६ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास कोथिंबीरीची वाढ कमी होते. कोथिंबीरीच्या पिकासाठी मध्यम कसदार आणि मध्यम खोलीची जमिन निवडावी. सेंद्रिय खते भरपूर प्रमाणात असल्यास हलक्या किंवा भारी जमिनीत कोथिंबीरीचे पिक चांगले येते.

सुधारीत जाती : नंबर ६५ टी ५३६५ एनपीजे १६ व्ही १ व्ही २ आणि को-१, डी-९२ डी-९४ जे २१४ के ४५ या कोथिंबीरीच्या स्थानिक आणि सुधारित जाती आहेत.

लागवडीचा हंगाम

कोथिंबीरीची खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश



तीनही हंगामात लागवड करतात. उन्हाळी हंगामात एप्रिल ते मे महिन्यात कोथिंबीरीचे उत्पादन घ्यावे.

लागवड पध्दती : कोथिंबीरीच्या लागवडीसाठी शेत उभे-आडवे नांगरुन चांगले भुसभुशीत करून ३२ मिटर आकाराचे सपाट वाफे बांधून घ्यावे. प्रत्येक वाफयात ८ ते १० किलो चांगली कुजलेली शेणखत टाकून मिसळून घ्यावे. वाफे सपाट करुन बी सारखे पडेल या बेताने फेकून पेरावे. बी खत मातीने झाकून हलके पाणी द्यावे. तणांचा प्रार्दुभाव जास्त प्रमाणात होत असल्यास सपाट वाफयामध्ये १५ ते २० सेमी अंतरावर खुरप्याने उथळ ओळी पाडून बी पेरावे आणि नंतर मातीने झाकून घ्यावे. उन्हाळी हंगामात पेरणीपुर्वी वाफे चांगले भिजवून घ्यावे. आणि वाफसा आल्यावर बियाणे पेरावे. कोथिंबीरीच्या लागवडीसाठी हेक्टरी ६० ते ८० किलो बी लागते. पेरणीपूर्वी बियाण्यांवर चांगली उगवण होण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. पेरणीपूर्वी धने फोडून बिया वेगळया कराव्यात यासाठी धने चपलेने अथवा लाकडी फळीने रगडून बी वेगळे करावे. तसेच पेरणीपूर्वी धन्याचे बी १२ तास पाण्यात उबदार जागी ठेवावे आणि नंतर लागवडीसाठी वापरावे. त्यामुळे उगवण १५ ते २० दिवसा ऐवजी ८ ते १० दिवसात होवून कोथिंबीरीच्या उत्पादनात वाढ होते आणि काढणी लवकर होण्यास मदत होते.

खते आणि पाणी व्यवस्थापन : कोथिंबीरीच्या पिकाच्या चांगल्या आणि जोमदार वाढीसाठी बी पेरताना हेक्टरी ३५ ते ४० गाडया शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. कोथिंबीरीच्या पिकाला पेरणीच्या वेळी ५० किलो १५-५-५ हे मिश्रखत द्यावे. बी उगवून आल्यावर २०-२५ दिवसांनी हेक्टरी ४० किलो नत्र द्यावे. कोथिंबीरीचा खोडवा घ्यावयाचा असल्यास कापणीनंतर हेक्टरी ४० किलो नत्र द्यावे. कोथिंबीरीला नियमित पाणी देणे आवश्यक आहे. सुरूवातीच्या काळात बियांची उगवण होण्यापूर्वी वाफयाला पाणी देताना वाफयाच्या कडेने वाळलेले गवत किंवा उसाचे पाचट लावावे.

काढणी उत्पादन आणि विक्री : पेरणीपासून दोन महिन्यांनी कोथिंबीरीला फुले येण्यास सुरुवात होते. म्हणून त्यापूर्वी हिरवीगार आणि कोवळी लुसलुशीत असतानां कोथिंबीरीची काढणी करावी. साधारणपणे १५ ते २० सेमी उंच वाढलेली परंतु फुले येण्यापूर्वी कोथिंबीर उपटून अथवा कापून काढणी करावी. नंतर कोथिंबीरीच्या जुडया बांधून गोणपाटात किंवा बांबूच्या टोपल्यांमध्ये व्यवस्थीत रचून बाजारात विक्रीसाठी पाठवावी. पावसाळी आणि हिवाळी हंगामात कोथिंबीरीचे हेक्टरी १० ते १५ टन उत्पादन मिळते तर उन्हाळी हंगामात ६ ते ८ टन उत्पादन मिळते.

किड व रोग : कोथिंबीरीवर फारसे रोग आणि किडी दिसून येत नाही.काही वेळा मर रोगाचा प्रार्दूभाव होतो. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी लांम सी एस-६ सारख्या भुरी प्रतिबंधक जातीचा वापर करावा. आणि पाण्यात विरघळणारे गंधक वापरावे.

cmyk



# असा रंगला दैनिक राज्य लोकतंत्रचा वर्धापनदिन सोहळा




cmyk

# दै.राज्य लोकतंत्रवर वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव!



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

बुधवार, दि.०२ एप्रिल २०२५ । पान ७

# म.ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले स्मारकाच्या कामाबाबत आढावा बैठक घेण्यासाठी नागरिकांचे आंदोलन

**पुणे । प्रतिनिधी**

आयुक्तांकडून आज बैठकिचे आयोजनङ्गङ्गङ्गपिंपरीङ्गपिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने अ क्षेत्रीय कार्यालय पिंपरी, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारकालगतच्या जागेत क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा व तसेच त्यांच्या जीवनावर आधारित न्यूरल्स सून आकर्षित फुले सृष्टी उभारण्याचे काम सुरू आहे. या कामाला वेग येत नाही. दिरंगाईने सुरू असलेल्या कामाला गती यावी यासाठी सर्व संधीत विभागाची मा.आयुक्तांनी बैठक आयोजित करावी, या मागणीसाठी नागरिकांनी मंगळवारी सकाळी एकत्र येत आंदोलन केले. यावेळी प्रशासनाचा निषेध व्यक्त करण्यात आला. दरम्यान, मा.आयुक्तांनी बुधवारी आढावा बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे लेखी पत्र आंदोलनकर्त्यांना दिले आहे.




शहराच्या नाव लौकिकात भर घालणारे स्मारकाचे काम सन २०२१ पासून सुरू आहे. सदर कामात वेळोवेळी ठक आयोजित करून सुद्धा संधित अधिकारी व ठेकेदार कामाला वेग देत नाही. सदर काम संतगतीने सुरू असून कामाची मुदत संपुष्टात आली असतानाही काम पूर्णत्वास गेले नाही. शिवाय सदर कामाचा दर्जा देखील निकृष्ट स्वरूपाचा दिसून येत आहे. महामानवाचे स्मारक उभारताना त्यात कुठल्याही प्रकारची तडजोड न करता ते दर्जेदार स्वरूपाचे उभारणे आवश्यक आहे. महापालिकेकडून चांगली सृष्टी उभारली जात असताना त्यामध्ये दिरंगाई होणे व त्यांचा दर्जा घसरणे योग्य नाही. तसेच सदर ठिकाणी पूर्ण वेळ सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेला असून सुद्धा त्या ठिकाणी एकही सुरक्षा रक्षक दिसत नाही. शिवाय या परिसरात कचरा जमा झाला असून तेथे मद्यपान करणाऱ्या घटना देखील घडत असल्याने त्या परिसराचे पवित्र नष्ट होत आहे. स्मारकाच्या कामकाजाबाबत आढावा घेण्यासाठी संधित सर्व विभागाचे अधिकारी, ठेकेदार यांच्या समवेत आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तातडीने बैठक घेऊन कामाची सद्यस्थिती जाणून घेऊन काम पूर्णत्वास कसे जाईल याबाबत आयुक्तांनी संधितांना आदेश द्यावेत. या सदर बैठकीस ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक समिती, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, बारा बलुतेदार महासंघ, ओबीसी संघर्ष समिती आणि इतर महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांना बोलवण्यात येऊन त्यांच्या समोर आढावा घेण्यात यावा. याशिवाय ११ एप्रिल २०२५ च्या क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले जयंती दिनी फुले सृष्टीचे भव्य स्वरूपात उद्घाटन करण्यात यावे, अशा मागण्या नागरिकांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केल्या. याबाबत २० मार्च २०२५ रोजी पत्र व्यवहार केला होता मात्र याला प्रतिसाद मिळाला नाही.

यामुळेच नागरिकांनी मंगळवारी निषेध आंदोलन केले. या आंदोलनात मा.आनंदा कुदळे, मा.विशाल जाधव, मा.शंकर लोंढे, संतोष अण्णा लोंढे,मा.सुरेश गायकवाड, निखिल दळवी, ॲड. विद्या शिंदे, मा.रोहिणी रासकर मानव कांबळे, मारुती बापकर, वैभव जाधव, कविता खराडे, प्रदीप पवार, अनिल साळुंखे, हनुमंत माळी, सूर्यकांत ताम्हाणे, विश्वासराव राऊत, प्रकाश गोरे, नकुल महाजन, संतोष कुदळे, मायावती मोतीरावे, ज्योती परदेशी, भास्कर लोंढे, हनुमंत लोंढे, कृष्णा लोंढे, विजय लोंढे, ज्ञानेश्वर बिडवे, महेश भागवत, नारायण भागवत, सुहास कुदळे यांच्यासह असंख्य नागरिक सहभागी झाले होते. दरम्यान, सदरील आंदोलनाची दखल घेत मा.आयुक्तांनी बुधवारी दि.२ रोजी सकाळी अकरा वाजता बैठक आयोजित केली असून, तसे लेखी पत्र दिले आहे.

## लोणावळा ग्रामीण पोलिसांनी ५७ हजार किलो गोमांस पकडल

**लोणावळा । प्रतिनिधी**

लोणावळा ग्रामीण पोलिसांनी २५ मार्च रोजी रात्री बाराच्या सुमारास लोणावळा ग्रामीण पोलिस स्टेशनच्या हद्दीमध्ये एक्स्प्रेस वेवर दोन संशयित कंटेनर ताब्यात घेतले होते. त्या कंटेनरमध्ये जनावरांचे मांस होते. दोन्ही कंटेनरमधील मांसाचे नमुने हे तपासण्यासाठी पाठवण्यात आले होते त्यांचा अहवाल शनिवारी उशिरा प्राप्त झाला असून, त्या कंटेनरमध्ये असलेले मांस हे गोमांस असल्याचे स्पष्ट झाल्याने शनिवारी रात्री उशिरा लोणावळा ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये याबाबतचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही कंटेनरमध्ये मिळून तब्बल ५७ हजार किलो मांस आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणामध्ये हे गोमांस विक्रीसाठी नेले जात होते.

लोणावळा ग्रामीणचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश वाघमारे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी कंटेनर (एमएच ४६ बीएम ९१८०) व कंटेनर (एमएच ४६ सीयू ९९६६) हे व त्यांचे चालक नदीम कलीम अहमद (राहणार न्हावाशेवा, नवी मुंबई) व नसीर मोहंमद अहमद (राहणार न्हावाशेवा, नवी मुंबई) यांना ताब्यात घेतले आहे. मे. एशियन फूड्स मीन अँग्रो (न्यू भोईबुडा, सिकंदराबाद हैदराबाद) या कंपनीमधून हे दोन्ही एअर कंडिशनर कंटेनर मांस भरून (न्हावाशेवा, पोर्ट मुंबई) येथे ट्रान्स्पोर्ट करण्यासाठी निघाले होते. पुणे येथील एका गोरक्षकाने याबाबतची माहिती लोणावळा ग्रामीण पोलिसांना दिली होती. त्या माहितीच्या अनुषंगाने ग्रामीण पोलिस व लोणावळा शहर ग्रामीण भागामधील गोरक्षक व विविध संघटनांचे कार्यकर्ते यांनी सदरचे कंटेनर पकडले होते. सुरुवातीला या मासांबाबत कागदपत्रे दाखवत ते गोमांस नसून म्हशीचे मांस असल्याचे सांगण्यात आले होते. तशा प्रकारची कागदपत्रे देखील दाखवली गेली. मात्र, गोरक्षक संघटनांनी सदरची कागदपत्रे संशयास्पद असून, कंटेनरमधील मांसाची तपासणी झाल्याशिवाय सदरचे कंटेनर पुढे सोडण्यात येऊ नये, अशी मागणी लावून धरली व लोणावळा ग्रामीण पोलिसांनीदेखील सदरच्या मासाचे सॅम्पल घेत ते तपासणीसाठी पाठवले. तपासणी अहवाल आल्यानंतरच पुढील कारवाई केली जाईल, असे सांगण्यात आले.

## मोईत विकासकमांचे भूमिपूजन, उद्घाटन



**खेड । प्रतिनिधी**

मोई (ता. खेड) येथे रविवारी (दि. ३०) सकाळी १०.३० वाजता गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर जनजीवन मिशन योजना अंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीचा वास्तुशास्त्र व भूमिपूजन तसेच उद्घाटन समारंभ आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते करण्यात आला, असे सरपंच शिलाताई रोकडे यांनी सांगितले.

यावेळी खेड तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती कल्पना गवारी, उपअभियंता के. एन. खरात, कनिष्ठ अभियंता एम. एम. शुंगारे, सरपंच शिलाताई रोकडे, उपसरपंच सोमनाथ गवारी, सदस्य संतोष येळवंडे, सदस्या आरती फलके, सारिका करपे, ग्रामपंचायत अधिकारी दमयंती शेंडगे, पोलीस पाटील निखील रोकडे,माजी आदर्श सरपंच पाटील गवारे, उपसरपंच गोरख गवारे, किरण गवारे, सामाजिक कार्यकर्ते संतोष रोकडे, संतोष गवारे व सर्व आजी-माजी पदाधिकारी व ग्रामस्थ तसेच सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन समस्त ग्रामस्थ व ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले होते.

## अजित पवार यांच्या निकटवर्तीयाच्या घरासमोर जादूटोणाचा प्रकार, नारळ, बाहुल्या, लिंबू अन् काळा बुक्का

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे विद्याचे माहेरघर असलेले शहर म्हटले जाते. पुण्याला देशाची सांस्कृतिक राजधानी म्हटले जाते. या पुण्यात काळू जादूसारखा अघोरी प्रकार समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि अजित पवार यांचे निकटवर्तीय असलेल्या नेत्याच्या घरासमोर हा प्रकार झाला. पुण्याचे माजी महापौर असलेले दत्ता धनकवडे यांच्या बंगल्यासमोर काळी जादूटोणा करण्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

पुण्यातील धनकवडी परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे नेते दत्ता धनकवडे राहतात. त्यांच्या बंगल्यासमोर काळी जादू करण्याचा धक्कादायक प्रकार २९ मार्च रोजी करण्यात आला. नारळ, दहीभात, उकडलेले अंडी, लिंबू, काळा बुक्का असे काळ्या जादूचे साहित्य त्यांच्या घरासमोर आढळून आले आहे. अघोरी विधी करणाऱ्या महिलेचे नाव धानका काकासाहेब चव्हाण असे आहे.

आरोपी धानका ही गेल्या चार महिन्यांपासून अमावस्येच्या दिवशी धनकवडी



परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी अघोरी विधी करत आहे. वेगवेगळ्या व्यक्तींच्या घरासमोर नारळ, दहीभात, उकडलेले अंडी, लिंबू, काळा अगीर हे काळ्या जादूचे साहित्य ठेवून अघोरी विधी करत असल्याची माहिती समोर येत होती. २९ मार्च रोजी अमावस्येच्या दिवशी रात्री आठ वाजता धानका हिने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी महापौर दत्ता धनकवडे यांच्या बंगल्यासमोर हा प्रकार केला. नारळ भातुकलेल्या अंडी, लिंबू आदी आघोरी प्रकार ठेवून जादूटोणा करण्याचा धक्कादायक प्रकार केला आहे. थेट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एका बडा नेत्याच्या घरासमोर जादू टोण्याचा धक्कादायक प्रकार केला. हे प्रकरण उघडकीस आल्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची माहिती स्थानिक लोकांना समजल्यावर त्या महिलेस पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या प्रकरणी पोलीस चौकशीतून काय माहिती समोर येते? त्या महिलेस हे कृत्य कोणी करायला लावले? या प्रश्नांची उत्तरे मिळण्याची शक्यता आहे.

## पुण्यात माजी नगरसेविकेच्या मुलाकडून तरुणीवर लैंगिक अत्याचार

**पुणे । प्रतिनिधी**

तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यावर लैंगिक अत्याचार आणि नंतर तिला धमकावून गर्भपात केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित तरुण माजी नगरसेविकेचा मुलगा आहे. याबाबत पीडित तरुणीने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याची आई माजी नगरसेविका असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तरुण आणि पीडित तरुणीची २०२१ मध्ये एका व्यायामशाळेत ओळख झाली होती. पीडित तरुणीचा व्यवसाय आहे. ओळखीचे रूपांतर पुढे मैत्रीत झाले.

त्यानंतर आरोपीने तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तो तिला भेटण्यासाठी घरी जायचा. तिने त्याच्याकडे विवाहाबाबत विचारणा केली, तेव्हा त्याने टाळाटाळ सुरू केली. आरोपीचे अन्य तरुणींशी प्रेमसंबंध असल्याचा संशय तरुणीला होता. याबाबत तिने विचारणा केली असता त्याने तिला शिवीगाळ करून धमकावले. तिला मारहाण केली. मारहाण केल्यानंतर तरुणीने त्याच्याशी बोलणे बंद केले, असे पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## तमाशात हुल्लडबाजी केल्यास कारवाई होणार; शिरसगाव काटा ग्रामस्थांचा निर्धार

**पुणे । प्रतिनिधी**

मांडवगण फराटा: शिरसगाव काटा (ता. शिरूर) येथील ग्रामस्थांची गुढीपाडव्यानिमित्त आयोजित केलेली बैठक मोठ्या खेळीमेळीत पार पडली. या वेळी सर्वानुमते गावच्या तमाशा कार्यक्रमात हुल्लडबाजी करणार्यांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरवर्षी गुढीपाडव्यानिमित्त आढावा बैठकीचे आयोजन करण्यात येते. यात गावातील विकासकामे तसेच यात्रेच्या तयारीचा आढावा घेतला जातो. रविवारी (दि. ३०) ग्रामस्थांची बैठक पार पडली. या बैठकीत मागील वर्षीचा खर्चाचा तपशील मांडण्यात आला. यावर ग्रामस्थांनी चर्चा केली.

श्री रामनवमीनिमित्त दि. ६ व ७ एप्रिल रोजी ग्रामदैवत श्री कोल्हाटीबुवा महाराज यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेच्या तयारीचा आढावा ग्रामस्थांनी घेतला. यावर अनेकांनी सूचना मांडल्या. दरवर्षी



यात्रेतील तमाशात होणारा गोंधळ व होणार्या हुल्लडबाजीला आळा घालण्याचा ग्रामस्थांनी एकमुखाने निर्णय घेतला तसेच यात्रा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्याचे ठरविले. दरम्यान, बंडूकाका कुलकर्णी यांनी वार्षिक पंचांगाचे वाचन केले. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब कोळपे, घोडगंगा कारखान्याचे संचालक नरेंद्र माने, माजी सरपंच सतीश चव्हाण, ज्येष्ठ नेते रामभाऊ कदम, रामचंद्र केदारी, सहायक पोलिस आयुक्त युनुस शेख, विकास जगताप, प्रवीण कदम, संतोष जाधव, गोपाल काटे, जयदीप पवार आदी उपस्थित होते.

## आलेगाव पागामध्ये सर्वधर्मीयांनी दिल्या ईदच्या शुभेच्छा


**रांजणगाव सांडस । प्रतिनिधी**

आलेगाव पागा (ता. शिरूर) येथे रमजान ईद निमित्त हिंदू, बौद्ध, जैन लिंगायत आदि सर्व जाती धर्मातील बांधव एकत्र येत एकमेकांना शुभेच्छा देऊन रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. शुभेच्छा देणारे फ्लेक्स सोशल मीडियावर फिरत होते. आलेगाव पागा येथे नमाज अदा केल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. गळाभेट घेऊन शुभेच्छा देण्यास सर्व धर्मीय येथे एकत्र आले होते. मौलाना यांना शाल, हार आणि सर्व मुसलमान बांधवांना गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्याचे नियोजन तंटामुक्तीचे अध्यक्ष संतोष आरवडे यांनी केले होते. यावेळी हरिभाऊ तोंडे, शिरूर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य तुकाराम बेनके, माजी सरपंच सतीश आरवडे, कालिदास हरिहर, रामदास वाघचौरे, महावीर दर्डा, वैभव शिंदे, ज्ञानेश्वर वेताळ, बाळकृष्ण वाघचौरे, सोसायटीचे अध्यक्ष तुकाराम मोरे, बाळासाहेब भोसले, लक्ष्मण कांबळे, राजेंद्र शिंदे, सोमेश्वर वाघचौरे आदींनी शुभेच्छा दिल्या. यावेळी मिठूमामा शेख, अल्लाबक्का शेख, बुड्डन सय्यद, राजू सय्यद, शाहीर शेख, बाबूलाल शेख, समीर शेख, शिहीर शेख, बबूल मामू, फिरोज शेख आदी उपस्थित होते.

## राजगुरूनगरला शोले स्टाईल आंदोलन

**खेड । प्रतिनिधी**

राजगुरुनगर नगरपरिषदेने लागु केलेली भरमसाठ करवाढ तत्काळ मागे घ्यावी अथवा त्या करवाढीला स्थगिती मिळावी यासाठी १५ दिवसांपूर्वी आंदोलन करणाऱ्या ड दीपक थिगळे यांनी मंगळवारी (दि १) शोले स्टाईल आंदोलन सुरू केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जुन्नर येथे निवेदन देण्यात आले होते.



नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचीही भेट घेऊन माहिती दिली होती. दोन्ही मंत्री तसेच उपोषण आंदोलनाला भेट देऊन पाठिंबा व्यक्त करणाऱ्या आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी सुध्दा स्थगिती मिळवुन देऊ असे सांगितले होते.त्यानंतर चार दिवस सुरू असलेले ते आंदोलन मागे घेण्यात आले होते.

विधानसभा अधिवेशन काळात किंवा मार्च अखेरीस शासन करवाढीला स्थगिती देईल अशी अपेक्षा थीगळे व सहकाऱ्यांना होती. आश्वासन देऊन निराशा पदरी पडल्याने हतबल झालेले ड दीपक थिगळे यांनी नव्या दमाने पुन्हा आंदोलन सुरू केले आहे.त्यांच्या अचानक सुरू झालेल्या आंदोलनाची माहिती मिळताच प्रशासकिय अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले. शासनाने करवाढ राजगुरुनगर येथील प्रांताधिकारी कार्यालया समोरच्या नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीवर सकाळी आठच्या दरम्यान हे आंदोलन सुरू केले आहे.

# लग्नापूर्वीच पतीच्या हत्येचा कट; सुपारी देणारी महिला फरार, पाच जणांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

होणारा नवरा पसंत नसल्याच्या कारणावरून एका महिलेने त्याला जिवे मारण्यासाठी १.५ लाख रुपयांची सुपारी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यवत पोलीस स्टेशनच्या हद्दीत, खामगाव फाट्याजवळ सोलापूर-पुणे हायवेवर २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ७:३० वाजता हा हल्ला घडला. या प्रकरणात यवत पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली असून, मुख्य सूत्रधार मयुरी सुनिल दांगडे ही अद्याप फरार आहे. पोलिसांनी तिचा शोध तीव्र केला आहे.

फिर्यादी सागर जयसिंग कदम (वय २८, व्यवसाय हॉटेल कुक, रा. माही जळगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, घटनेच्या दिवशी सायंकाळी ७:५० च्या सुमारास साई मिसळ हॉटेलजवळ पांढऱ्या वेरणा कारमधून (पाठीमागील नंबर प्लेटवर 'महाकाल' लिहिलेले) आलेल्या अज्ञात व्यक्तींनी त्यांना अडवले. जर तू मयुरीशी लग्न केले तर तुला दाखवतो, अशी धमकी देत हल्लेखोरांनी लाकडी दांडक्याने त्यांच्यावर हल्ला



केला. या मारहाणीत सागर गंभीर जखमी झाले. त्यांनी १ मार्च २०२५ रोजी यवत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली, ज्यानंतर गुन्हा क्रमांक २१७/२०२५ अंतर्गत भादंवि कलम ११८(१), ३५२, ३५१(२)(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला गेला.

तपासादरम्यान, २८ मार्च २०२५ रोजी संशयित आदित्य शंकर दांगडे (वय १९, रा. गुघलवडगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने सांगितले की, मयुरी सुनिल दांगडे आणि संदीप दादा गावडे (वय ४०, रा. गुघलवडगाव) यांच्या सांगण्यावरून हा हल्ला घडवण्यात आला. मयुरीला सागर पसंत नव्हता, त्यामुळे तिने १.५ लाखांची सुपारी देऊन सागरला मारण्याचा कट रचला. या कटात आदित्यासह शिवाजी रामदास जरे (वय ३२, रा. पिंपळगाव पिसा), इंद्रभान सखाराम कोळपे (वय ३७, रा. पिंपळगाव पिसा), आणि सुरज दिगंबर जाधव (वय ३६, रा. काष्टी) यांचा समावेश होता. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आदित्य आणि संदीप यांना २८ मार्च रोजी, शिवाजी याला २९ मार्च रोजी, तर इंद्रभान आणि सुरज यांना त्याच दिवशी रात्री अटक केली. हल्ल्यात वापरलेली कार आणि लाकडी दांडके जप्त करण्यात आले. तपासात हल्ल्याचा उद्देश सागरला जिवे मारणे हा असल्याचे स्पष्ट झाल्याने भादंवि कलम १०९, ६१(२), आणि १२६(२) वाढवण्यात आले.

या कारवाईत पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली यवत पोलीस स्टेशनचे निरीक्षक नारायण देशमुख, सहायक निरीक्षक महेश माने, प्रविण संपांगे, उपनिरीक्षक किशोर वागज, मारोती मतलवाड, पोलीस कर्मचारी कर्चे, गायकवाड, देवकर, काळे, चांदणे, यादव, कापरे, बाराते, करूड, भानवसे यांनी सहभाग घेतला. सध्या फरार असलेल्या मयुरी दांगडेचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके तैनात केली असून, तपास सहायक निरीक्षक महेश माने करत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

## अनैतिक संबंधातून शेतकऱ्याला संपविले; ३ तासांत आरोपी पत्नी पोलिसांच्या ताब्यात

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

घराच्या बाहेर झोपलेल्या व्यक्तीचा तीक्ष्ण हत्याराने खून केल्याची घटना मंगळवारी (ता. १) सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. सदर घटना ही लोणी काळभोर परिसरातली रायवाडी रोड, टाक्याचा माळ, सिद्धनाथ मंदिराजवळ असणाऱ्या वडाळी वस्ती येथे घडली होती.

रवींद्र काशिनाथ काळभोर (वय-४५, रा. वडाळी वस्ती, रायवाडी रोड, टाक्याचा माळ, सिद्धनाथ मंदिराजवळ लोणी काळभोर) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत लोणी काळभोर पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास चक्र जलद गतीने फिरवले. तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांच्या मदतीने सदर ठिकाणच्या आजूबाजूच्या परिसरातील लोकांकडील माहिती आणि परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे अवघ्या ३ तासांत पोलिसांनी आरोपींच्या मुसक्या आवळल्या. गोरख त्र्यंबक काळभोर (वय ४१) आणि मयत यांची पत्नी शोभा रवींद्र काळभोर (वय ४२) असे आरोपींची नाव आहेत. लोणी काळभोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी काळभोर परिसरातली रायवाडी रोड, टाक्याचा माळ, सिद्धनाथ मंदिराजवळ असणाऱ्या वडाळी वस्ती येथे बाहेर पलंगावर रक्ताच्या थारोळयात एक व्यक्ती जखमी व बेशुध्द अवस्थेत असल्याची माहिती मिळाली.

सदर घटनास्थळी पोलिस पथक दाखल होऊन पाहणी केली असता रवींद्र काळभोर यांचा तीक्ष्ण हत्याराने खून झाल्याचे निदर्शनास आले. याबाबत मृत काळभोर यांच्या पत्नी शोभा रवींद्र काळभोर यांच्याकडे कसून चौकशी केली असता तिने गोरख त्र्यंबक काळभोर याच्याशी असलेल्या अनैतिक संबंधातून खून केल्याची कबुली पोलिसांना दिली.

लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गु.र.नं. १५१/२०२५ बी. एन. एस. क. १०३, ३(५) महा. पोलिस कायदा कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलिस उप आयुक्त परिमंडळ ५ पुणे शहर, सहा. पोलिस आयुक्त हडपसर विभाग अनुराधा उदमले, आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक लोणी काळभोर राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक अनिल जाधव, पोलिस उप निरीक्षक उदय काळमोर, पोलिस उप निरीक्षक सर्जेराव बोबडे, पोलिस उप निरीक्षक रत्नदिप बिराजदार, पोलिस उप निरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलिस उप निरीक्षक पुजा माळी, पो. हवा. देवीकर, शिंदे, वणवे, नागलोत, मेमाणे, पो. शि. विर, शिरगीरे, कर्डीले, गाडे, कुंभार, सोनवणे, बनकर, जोजारे, धुमाळ, महिला पोलीस हवा, नवले, होले, म.पो.शि. उषा थोरात यांनी केली आहे.

cmyk